सं.फौ.ख.क्र.२००६/२०२३.
<u>सरकार/कमल</u> आंभोरे
नि.क्र.१३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.<u>०१</u> यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | **अर्चना आलोक पांडे,** |
| **वय** | : | **५० वर्षे, व्यवसाय : खाजगी नौकरी,** |
| **राहणार** | : | **इंम्पेरिअल सिटी, कोतेवाडा, गुमगाव, तह. हिंगणा, जि. नागपूर.** |

**सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डी.आय.बारस्कर यांच्यामार्फत सूरुः-**

**०१.** मी आरोपीला ओळखते. आरोपी माझ्-या शेजारी राहते. ती आज न्यायालयात हजर आहे. मी सन-२०१८ पासुन इंम्पेरिअल सिटी, कोतेवाडा, गुमगाव, तह-हिंगणा, जिल्हा-नागपुर येथे राहते. माझ्-या घरी मी, माझे पती व सासु-सासरे असे राहतो. माझ्-याकडे लॅब्रा प्रजातीचा एक कुत्रा आहे. घटनेच्या वेळेस माझा लॅब्रा प्रजातीचा कुत्रा हा अडीच वर्षाचा होता.

**०२.** आरोपी हे मी इंम्पेरिअल सिटी, कोतेवाडा येथे राहायला आल्यानंतर एक ते दिड वर्षानंतर तेथे राहायला आले. माझ्-या फलॅटचा क्रमांक आय-२० व आरोपीचा फलॅट क्रमांक आय-२१ असा आहे. आरोपीच्या घरी आरोपी, तीचा पती, दोन मुले व दोन कुत्रे असे राहतात. आरोपीकडे दोन जर्मन शेफर्ड प्रजातीचे कुत्रे आहेत.

**०३.** घटनेच्या पुर्वीसुद्धा आरोपीचे कुत्रे हे माझ्-या मुलीच्या अंगावर, माझ्-या कुत्र्यांच्या अंगावर, माझ्-या पतीच्या अंगावर हल्ला करण्याकरीता आले होते. तेव्हा मी आरोपीला समजावुन सांगीतले होते. घटना दिनांक १०.०४.२०२३ रोजी सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास माझ्-या घ राच्या दरवाज्यावर घडली. घटनेच्या दिवशी मी घरी एकटी हजर होते. घटनेच्या वेळेस चार-पाच मिनीटापुर्वी मी माझ्-या कुत्र्यांला घेवुन फिरायला जात होते. तेव्हा आरोपी ही तीच्या दोन्ही कुत्र्यांसोबत आमच्या घरासमोरील कॉलोनीच्या गल्लीमध्ये उभी होती. तेव्हा आरोपीचे स्वतःच्या कुत्र्यांवरील नियंत्रण सुटले व सदर दोन्ही कुत्रे तिच्या हातुन सुटुन माझ्-या कडे धावुन आले, तेव्हा माझ्-यावर व माझ्-या कुत्र्यांवर आरोपीचे कुत्रे हल्ला करतील या भितीने मी पहिले माझ्-या कुत्र्यांला माझ्-या दरवाज्याच्या आतमध्ये ढकलले. तेव्हा आरोपीच्या मोठया कुत्र्याने माझ्-या डाव्या पायाच्या पोटरीला पकडले, त्यामुळे मी खाली पडले. तेव्हा आरोपीचा दुसरा कुत्रा माझ्-या अंगावरुन उडी मारुन माझ्-या घरामध्ये डायनींग टेबल पर्यंत माझ्-या कुत्र्यांमागे गेला. त्यावेळेस मी ओरडले असता, माझ्-या घरात काम करणारी बाई बिना गणेश गंदेवार ही माझ्-या किचन मधुन बाहेर आली. तसेच तेव्हा माझा डायव्हर नामे विकी दुबे, आरोपीचा पती, आरोपीचा मुलगा व आरोपी धावत आले. त्यानंतर आरोपीने तिचे दोन्ही कुत्रे घेतले व तेथुन निघुन गेली. आरोपीच्या मोठया

कुत्र्यांने माइ-या डाव्या पायाचे मास तोडले होते. त्यानंतर मला स्वामी विवेकानंद हॉस्पीटल, खापरी येथे नेण्यात आले व तेथे माइ-यावर उपचार केला. तेथे माइ-या पायावर १७ टाके लावण्यात आले. त्यानंतर मी दिनांक ११.०४.२०२३ रोजी आरोपी विरुद्ध घटनेनिमित्ताने तक्रार दिली. सदर तक्रार मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तक्रारला **नि.क्र. १४** देण्यात येत आहे. आता मला छापील एफ.आय.आर. दाखविण्यात आली. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. एफ.आय.आर.ला **नि.क्र.१५** देण्यात येत आहे.

**०४.** माइ-याकडे असलेल्या कुत्र्यांचा कलर काळा होता. जर्मन शेफर्ड कुत्र्यांचा कलर हा ब्राउन व ब्लॅक कलरचा मिश्रीत कलर असतो. तोच कलर आरोपीच्या कुत्र्यांचा होता. उपरोक्त घ टना ही माइ-या घरी लावलेल्या सिसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली. त्याबाबतचे फुटेज आम्ही भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५-ब अन्वयेच्या प्रमाणपत्रासह पोलीसांना तपासकामी दिले होते. सदर प्रमाणपत्र माइ-या पतीने सही करुन दिले होते. सदर सिसीटीव्ही फूटेज मला दाखविल्यास त्यामधील मजकुराबाबत मी सांगु शकते.

**०५.** आता मला न्यायालयातध्ये जी.पी.नंबर ५८/२०२५ नुसार दाखल असलेल्या मुद्येमालामधील पेनड्राईव्ह फूटेज मधील पार्कींग एरीया नावाने सेव्ह असलेला व्हिडीयो न्यायालयाच्या संगनकावर आरोपी व त्याचे विधीज्ञ, तसेच सरकारी वकील यांच्या समक्ष चालू करुन दाखविण्यात आला (सदर पेनडाईव्ह मधील व्हीडीयो न्यायालयाच्या संगनकावर चालू करण्यापुर्वी आरोपी व त्याचे विधीज्ञ, तसेच सरकारी वकील यांनी त्याकरीता संमती दिली). त्यामधील १०:३७:२३ ते १०:३७:२६ या वेळेमधील आरोपीचे दोन्ही कुत्रे व आरोपी हे माइ-या मागे धावत येतांना दिसत आहे. त्यामधील दोन्ही जर्मन शेफर्ड कूत्रे हे आरोपीचेच आहे व त्यांच्यामागे धावणारी महिला ही आरोपी आहे. मी त्यांना ओळखते.

**०५.** आता मला न्यायालयातध्ये जी.पी.नंबर ५८/२०२५ नुसार दाखल असलेल्या मुद्येमालामधील पेनड्राईव्ह फूटेज मधील मेनगेट नावाने सेव्ह असलेला व्हिडीयो न्यायालयाच्या संगनकावर चालू करुन दाखविण्यात आला. त्यामधील १०:३७:२५ ते १०:३७:३८ पर्यंत माइ-या डाव्या पायाला चावणारा मोठा कुत्रा व अंगावरुन गेलेला कुत्रा हा आरोपीचाच आहे व कुत्र्यांना ओढणारी महिला ही आरोपी आहे. त्यानंतर सदर व्हीडीयोतील १०:३७:४७ या वेळेला माइ-या सोबत दरवाजा बंद करण्याकरीता धावत येणारी महिला ही माइ-या घरी काम करणारी बिना गणेश गंदेवार आहे. तसेच सदर व्हीडीयो मध्ये १०:३८:०० या वेळेला येणारा मुलगा हा माइ-या कडे डायव्हर असलेला विकास उर्फ विकी दुबे आहे. तसेच सदर व्हीडीयोमध्ये १०:३८:४१ या वेळेला हिरव्या रंगाचे टिशर्ट घालून येणारा मुलगा हा आरोपीचा मुलगा आहे.

**०६.** आता मला न्यायालयातध्ये जी.पी.नंबर ५८/२०२५ नुसार दाखल असलेल्या मुद्येमालामधील पेनड्राईव्ह फूटेज मधील ड्राईंग रुम या नावाने सेव्ह असलेला व्हिडीयो न्यायालयाच्या संगनकावर चालू करुन दाखविण्यात आला. त्यामधील ०९:२६:४२ ते ०९:२६:५२ या वेळेतील व्हीडीयो मध्ये माइ-या अंगावरुन आतमध्ये आलेला कुत्रा तसेच त्यामध्ये माइ-या घरी काम करणारी बिना गणेश गंदेवार व झाडु पोछा करणारी दुसरी महिला नावे मंदा आरडाओरड करतांना दिसुन येत आहे. मी त्यांना ओळखते. सदर पेनड्राईव्हला **नि.क्र.१६** देण्यात येत आहे. (आरोपीच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आरोपींना उपरोक्त तिन्ही व्हीडीयोची प्रत मिळालेली नाही, त्यामुळे त्यांनी आरोपीच्या पेनडाईव्ह मध्ये सदर तिन्ही व्हीडीयो हे पेस्ट करुन देण्याची विनंती केली. उलटपक्षी, विद्वान सरकारी वकीलांनी हरकत नसल्याचे कथन केले. सबब, सदर तिन्ही व्हीडीयोची प्रत आरोपीने आणलेल्या पेनडाईव्हमध्ये पेस्ट करुन देण्यात आले). सिसीटीव्ही कॅमेरामध्ये वेळेची सेटींग चुकीची असल्यामूळे उपरोक्त व्हीडीयोमध्ये घटनेच्या वेळेबाबत तफावत आहे. मी तक्रार दिल्यानंतर पोलीस पंचनामा करण्याकरीता त्याच दिवशी आले होते. पोलीसांना घटनास्थळ माइ-या पतीने दाखविले होते. पोलीसांनी माझा जवाब नोंदविला होता.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे विधीज्ञांनी त्यांना व्हीडीयोची प्रत आजच मिळाल्यामुळे उलटतपास तहकुब करण्याची तोंडी विनंती केली. करीता उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2025.12.15 16:17:21 +0530

हिंगणा.
दि.१५.१२.२०२५

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा.